| | |
|---|---|
| | सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सह. बँक लि., सांगली<br>वि.<br>रमण काळगा |

# नि. २६ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २ व ३ तर्फे 'कॉस्ट नॉट पेड' चा आदेश सेट असाइड करण्यात यावा, 'वादीचा उलटतपास' हा आदेश रद्द व्हावा व उलटतपास घेण्यासाठी प्रतिवादीस परवानगी मिळावी, या करीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जाखाली वादीने म्हणणे दाखल करून तीव्र हरकत घेतली आहे. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी जाणून–बुजून दाव्याच्या कामकाजास लांबणीवर टाकण्याचे प्रयत्न करीत आहेत. अर्जामध्ये कोणतीही स्पष्ट कारणमीमांसा नमूद केली नाही. तरी, प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. उभय पक्षांचा युक्तीवाद सविस्तर ऐकण्यात आला.

४. प्रस्तुत अर्ज, त्यावरील वादीचे म्हणणे आणि अभिलेखावरील कागदपत्रे तसेच उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेण्यात आला.

५. सदर केस गुणदोषावर ठेवण्याकरीता प्रस्तुत अर्ज र. रू. १००/– (अक्षरी र. रू. शंभर मात्र) दंडासहीत मंजूर करण्यात येतो. सदर दंडरक्कम ही नि. २३ वरील अर्जातील दंडासोबत प्रतिवादींनी वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. अन्यथा प्रस्तुत अर्ज नामंजूर झाला, असे समजण्यात येईल.

JADHAV SUNEETA VITTHAL

Digitally signed by JADHAV SUNEETA VITTHAL
Date: 2026.09.07 16:50:58 +0530

(श्रीमती एस. व्ही. जाधव)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय क्र. १, सांगली.

स्थळ : सांगली.
दिनांक : ०७/०९/२०२६